**सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या नवीन महाविद्यालयांना व सध्या सुरु असलेल्या अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांमधील प्रवेश क्षमतेत वाढ / घट करण्यासाठी मान्यता देण्याबाबत.**

---

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : टीईएम-२००४/(२३५/०४)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २८ जून, २००४

**संदर्भ :** १) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या विभागीय कार्यालय, मुंबई यांचे क्र.२२/१७०६/२००४, दि.२८.६.२००४ चे पत्र.
२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.०६/०७/एमएस/फार्म./२००४/०२३ व इतर दि.२६.६.२००४ ची पत्रे.
३) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र.७४०/ ८९/२९९/(ई)/आरसी/९५, दि.२६.६.२००४ ची पत्रे.
४) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र. ७४०/८९/१३४(पी)/ इटी/९६, दि.२६.६.२००४ ची पत्रे.

**शासन निर्णय :** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या दिनांक २६.६.२००४ च्या संदर्भाधीन निरनिराळ्या पत्रान्वये सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र या पदवी अभ्यासक्रमांच्या **नवीन संस्थांना (प्रपत्र अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे )** व सध्या सुरु असलेल्या या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमधील **प्रवेश क्षमतेत वाढ / घट** करण्यासाठी **(प्रपत्र ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे)** मान्यता दिली आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची सदर मान्यता विचारात घेऊन शासनाकडून या शासन निर्णयान्वये संबंधीत नवीन संस्थांना व सध्या सुरु असलेल्या महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेतील फेरबदलास या **सोबतच्या प्रपत्र अ व प्रपत्र ब** नुसार सन २००४-०५ करीता मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर मान्यता खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे :-

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहीत केलेल्या तसेच दि.२१ मे,१९८३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधीत संस्थांना बंधनकारक राहील.

२) शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहीत केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल तसेच संबंधीत कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकांच्या समर्तीने समाधानकारक रित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमांच्या / महाविद्यालयांच्या संलग्नीकरणासाठी संबंधीत संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधीत विद्यापीठाची मान्यता / संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधीत संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश दिनांक १६.२.२००४ च्या शासन निर्णयान्वये व शासनाने मान्य केलेल्या संबंधीत अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमानुसार / पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) सध्या सुरु असलेल्या (जुन्या) संस्थांच्या बाबतीत परिषदेच्या मान्यतेच्या आदेशासोबत जोडलेल्या सहपत्रातील दर्शविलेल्या त्रुटींची पुर्तता सदर संस्थांनी याच वर्षी (२००४-०५) करणे आवश्यक असून, त्याचा पुर्तता अहवाल परिषदेच्या विभागीय कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही करावी.

७) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांनी / संस्थांनी त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहीत मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्या.र.चौरे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे/नागपूर / औरंगाबाद / अमरावती / नाशिक
मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
संबंधीत संस्थांना (संचालक, तंत्र शिक्षण यांचे मार्फत )
निवड नस्ती तांशि-१

प्रत,
१. सल्लागार, (युजी) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२
२. विभागीय अधिकारी , पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इन्श्युरन्स बिल्डींग, दुसरा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई २०

शासन निर्णय क्र.टीईएम-२००४/(२३५/०४)/तांशि-१, दि. २८ जून, २००४ चे

# प्रपत्र अ

## नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | श्री. विलेपार्ले केलवानी मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी, मिठीबाई कॉलेज कॅम्पस, विलेपार्ले ( पश्चिम ), मुंबई | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| २. | नॅशनल सेंटर फॉर रुरल डेव्हलपमेंटचे स्टर्लींग इन्स्टि.ऑफ फार्मसी, प्लॉट नं.९३, सेक्टर नं.१९, नेरुळ, नवी मुंबई | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ३ | हैदाबाद (सिंध) नॅशनल कॉलिजीएट बोर्डाचे कॉलेज ऑफ फार्मसी, सी.एच.एम.कॉलेज कॅम्पस, उल्हासनगर | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ४. | प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी (फॉर वुमेन), बोराडे वाडी, मु.पो.मुन्शी, ता.हवेली, जि.पुणे | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ५. | चौधरी अत्तार सिंग यादव मेमोरियल एज्युकेशन ट्रस्टचे सिध्दांत कॉलेज ऑफ फार्मसी, मु.पो.सुदुंबरे, ता.मावळ, जि.पुणे | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ६. | श्री.गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी, मु.डुंबार वाडी (ओतूर), पो.खामुंडी, ता.जुन्नर, जि.पुणे | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ७. | जगदंबा एज्युकेशन सोसायटीचे एस.एन.डी.कॉलेज ऑफ फार्मसी, मु.पो.बाभुळगांव, ता.येवला, जि.नाशिक | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ८. | श्री.संत कृपा कॉलेज ऑफ फार्मसी, घोगांव, ता.कराड, जि.सातारा | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| ९. | श्रीमती ताईसाहेब कदम सेवाभावी फाऊंडेशन अॅण्ड रिसर्च सेंटरचे यश इन्स्टि.ऑफ फार्मसी, तिसगाव, बोलवाडी, वाळुंज, एम.आय.डी.सी, औरंगाबाद | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |
| १०. | विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे ---- कॉलेज ऑफ फार्मसी, मु.पो.अळमाळा, ता.आवसा, जि.लातूर | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |